महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,

पुणे विभागीय मंडळ , पुणे - ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 / 25536712 (OFF)

FAX- 020/25536761

Telegram-'SECBOARD' PUNE

महत्वाची सूचना

# परिपत्रक

क्र.पुविम/भांडार/उ.प्र.पुर.इ. 850
पुणे - ४११ ००५
दिनांक-०५/०२/२०२६

विषय- इ.१२ वी परीक्षेसाठी उत्तरपत्रिका पुरवणी इ. तत्सम साहित्य वापराबाबत.

प्रति,
सर्व केंद्रसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
जिल्हे- पुणे,अहिल्यानगर ,सोलापूर.

सन २०२६ परीक्षेसाठी सर्व परीक्षा केद्रांना लेखी परीक्षेसाठी आवश्यक उत्तरपत्रिका, पुरवणी इ. तत्सम साहित्य मंडळामार्फत पुरविण्यात आले आहे. तरी उपरोक्त प्रमाणे उपलब्ध असलेले उत्तरपत्रिका, पुरवणी इ. साहित्य फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेसाठी वापरावयाचे आहे. आपण ताब्यात घेतलेले सर्व साहित्य केद्रांवरील व उपकेद्रांवरील प्रविष्ठ होणारी विद्यार्थी संख्या विचारात घेऊन साहित्य पुरेसे उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी. आपल्या केंद्रांच्या सर्व उपकेंद्रांवर प्रविष्ठ होणारी विद्यार्थी संख्येनुसार उपलब्ध साहित्यांची पडताळणी करून आढावा घेण्यात यावा.

त्यानुसार आपल्या मुख्य केंद्रासह सर्व उपकेंद्रासाठी उत्तरपत्रिका, पुरवणी उत्तरपत्रिका अपू-या पडत असल्यास सदरचे कमी पडत असलेले साहित्य परिरक्षक केंद्राकडून अथवा विभागीय मंडळाकडून तात्परतेने उपलब्ध करून घेण्यात यावे जेणे करून परीक्षा विना अडथळा सुरळीतपणे पार पाडू शकतील याची दक्षता घ्यावी.

खालील तपशील नुसार उत्तरपत्रिका, पुरवणी इ. वाटप करण्यात यावे.

| अ.क्र. | तपशील | विद्यार्थी संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | २८ पानी उत्तरपत्रिका | १ विद्यार्थी | ६ |
| २. | ४ पानी पुरवणी | १ विद्यार्थी | ३ |
| ३. | नकाशा भूगोल विषयासाठी | १ विद्यार्थी | १ |
| ४. | लॉग टेबल विज्ञानशाखा इ. | २ विद्यार्थीना | १ |
| ५. | होलोक्राफ्ट | १ विद्यार्थी | ८ |

तरी उपरोक्त प्रमाणानुसार प्रति विद्यार्थी संख्येनुसार उत्तरपत्रिकांचा आढावा घेण्यात यावा.

Scanned with OKEN Scanner

उत्तरपत्रिका, पुरवणी सुस्थितीत असल्याबाबत खात्री करावी. सर्व उत्तरपत्रिका, पुरवणी इ. तत्सम साहित्य सुरक्षित ठेवण्यात यावे. उत्तरपत्रिका, पुरवणी इ. साहित्यांचा आढावा घेउन कमी पडणारे आवश्यक साहित्यांची मागणी त्वरीत विभागीय मंडळाकडे करण्यात यावी व साहित्य उपलब्ध करून घेण्यात यावे.

मागणीची आग्रीम प्रत मंडळाच्या ई-मेलवर पाठविण्यात यावी.

१. pdbstoresection@gmail.com

२. sscboardpune@gmail.com

दिनांक / /२०२६ पर्यंत सर्व साहित्य केंद्र/उपकेंद्रांवर उपलब्ध असल्याची खात्री करावी.

उत्तरपत्रिका, पुरवणी इ. तत्सम साहित्यांच्या अभावामुळे कोणताही विद्यार्थी परिक्षेपासून वंचित राहणार नाही याची नोंद घ्यावी.

MBRaut

(डॉ.मिनाक्षी राऊत)
प्र. विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.

प्रत माहितीसाठी,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे

२. शिक्षणअधिकारी जिल्हापरिषद पुणे, अहिल्यानगर, सोलापूर

Scanned with OKEN Scanner